# छत्रपती शाहू महाराजांचे जलव्यवस्थानातील योगदान

*डॉ. कृष्णा मालकर

भारत हा कृषी प्रधान देश आहे. शेतीविकास म्हणजेच राष्ट्र विकास हे सुत्र म. फुले यांनी आपल्या विचारातून सातत्याने जोपासले आहे. बळीराजा हा शेतकऱ्यांचा कैवारी त्यामुळे म. फुले हिंदूस्थानचा उल्लेख 'बळीस्थान' असाच करीत 'शेतकरी सुखी तर जग सुखी' हे सुत्र म. फुले यांनी कधीच सोडलेले दिसत नाही. मा फुले स्वतः ला शेतकरी समजत असे आपल्या शेतीत ते नव–नविन प्रयोग करीत असत.[१] म. फुले यांचा शेती आणि शेतकरी यांच्या संबंधी असणारा दृष्टीकोण शाहू महाराजांनी आयुष्यभर जोपासला होता. आपल्या अठ्ठाविस वर्षाच्या कारकीर्दीत बहुजनांची भट ब्राम्हणांच्या मानसिक गुलामगिरीतून सूटका करण्यासाठी शाहू महाराज जसे अखेर पर्यंत लढत होते. त्याच प्रमाणे बहुजनांचे दारीद्रय संपुष्टात यावे यासाठी हि ते झगडत होते. त्यांची आर्थिक गुलामगिरीतुन ही मुक्तता व्हावी म्हणुन शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात अनेक ध्येय धोरणे राबविले.[२] सामान्य मानसामध्ये जागृती निर्माण करणे त्याला त्याच्या शक्तीची जाणीव करूण देणे, त्याला विविध उद्योग, व्यवसाय व त्यामधून निर्माण होणाऱ्या विविध वस्तु उपलब्ध करून देणे, असे अनेक हेतू महाराज साध्य करत असे या मागे त्यांचे आर्थिक विचार होते व कृतिची बैठक होती. हातातील सत्ता, संपत्ती व संस्थानातील साधन सामुग्रींचा अत्यंत तळमळीने प्रजेच्या कल्याणासाठी महाराजांनी वापर केला. सामान्य तळागाळातील उपेक्षीत माणूस केंद्र बिंदू माणुन त्यांची वैचारीक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणुन एकाच वेळी अनेक आघाड्यावरून त्यांनी हल्ला चढविला महाराजांनी संस्थानामध्ये अधिकर सूत्रे हाती घेतल्या पासुन शेतीचा विकास व्हावा म्हणुन सर्वतोपरी प्रयत्न केले. कोल्हापूर संस्थानामध्ये जवळ–जवळ सर्वच लोक शेतीवर आपली उपजिवीका भागवित होते. ग्रामीण भागातील लोकांची गरीबी कमी करायची असेल तर सामान्य शेतकऱ्यांची स्थिती सुधारली पाहिजे. त्यासाठी महाराजांनी शेती–संशोधन, फळबाग लागवडीचे विविध प्रयोग, भांडवलपूरवठा, शेतीविषयक प्रदर्शने, आदर्श शेतीचे आधूनिकीकरण, जोड व्यवसाय, या सर्व बाबींवर भर दिला. कारकीर्दीच्या सुरूवातीपासून संस्थानामध्ये दुष्काळाला तोंड द्यावे लागले. त्यासाठी जून्यातलावाची दुरूस्ती नविन तलाव बांधनी व मोठ्या तलावाच्या योजना हाती घेतल्या प्रजेला पिण्याचे पाणी उपलब्ध झाले. शेतीला नियमित पुरेसे पाणी मिळाले पाहिजे म्हणजे शेती उत्पादन वाढेल, शेतकरी स्वावलंबी होईल. आधुनिक पद्धतीने शेती करता येईल. सहकाराला चालना मिळेल. शेतीचा व पर्यायाने संस्थानचा विकास होण्यास मदत होईल. असे महाराजांचे विचार होते. म्हणुनच शेतील पाण्याची जोड उपलब्ध करून देण्यासाठी अनेक लहान मोठया योजना बरोबरच एक दिर्घकालीन योजनाही महाराजांनी कार्यवाहीत आणली ती योजना महाराजांच्या कारकिर्दीचे कायमस्वरूपी स्मारक म्हणुन कोल्हापूर जिल्हयाला वरदान ठरलेली आहे. ती योजना म्हणजेच राधानगरी धरण होय.[३]

**धरणाची योजना** :अशा तऱ्हेच्या योजने बद्दलची कल्पना महाराजांना परदेश दौऱ्यात सुचली. साडेतीन महिने ते परदेशात राहिले परदेशात असतांना त्यांनी शेती आणि उद्योगाचे प्रकल्प बारकाईने पाहिले याच दौऱ्यात त्यांनी इंग्लंड आणि इटली या देशातील लहान मोठ्या उद्योगाची आणि शेती प्रकल्पाची पाहणी केली. त्यामुळे त्यांच्या मनात आपल्या संस्थानामधील शेतील आणि युरोप मधील काही देशातील शेती यांची तुलना सुरू झाली. आपली शेती सुधारण्यासाठी कोणकोणते उपाय करता येतील याचा ते गांभीर्याने विचार करू लागले. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की पावसाच्या भरवश्यावर चालणारी शेती अधिक फायदेशीर करावयाची असेल तर त्यासाठी शेतील कायमचा पाणीपुरवठा करणाऱ्या लहान मोठ्या पाणीपुरवठ्याच्या योजना प्रत्यक्ष कार्यान्वीत कराव्या लागतील.

शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी एक खास विभाग आपल्या प्रशासनात त्यांनी सुरू केला या विभागाचे प्रमुख म्हणुन सीताराम गुप्ते यांना 'इरिगेशन ऑफिसर' म्हणुन नेमण्यात आले. संस्थानामध्ये अस्तित्वात असलेल्या पाटबंधाऱ्याच्या सोयीची प्रत्येक गावानुसार तपशीलवार पाहणी करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. संस्थानात असलेले सरकारी तलाव व खाजगी विहीरी यांचा शेतीला पाणीपुरवठा होण्याच्या दृष्टीने प्रत्येत गावातील तालुक्यातील गावाचा तक्ता करण्यास सांगण्यात आले या शिवाय ज्यापासुन सरकारला थोडे उत्पन्न येऊन रयतेस फायदा मिळण्या जोगा असेल अशा प्रकल्पाची यादी तयार करून वेगळा अहवाल सादर करण्यास सांगण्यात आले. इ. स. 1906–07 च्या अहवालानुसार दोन तलावाची पाहणी करण्याची जबाबदारी मि. मित्तल यांच्यावर सेपवीण्यात आली. पहिली योजना म्हणजे फेजीवडे नजिक भेगावती नदीवर धरण बांधने. दुसरी योजना म्हणजे भुदरगड तालुक्यातील फरळे नजिक दुधगंगेवर धरण बांधने. हा निर्णय सार्थक ठरविल्यामुळे कोल्हापुर जिल्ह्यातील शेतीचा कायापालट झाला.[४] त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढले सहकार

* उपप्राचार्य श्री.आ.भां. महाविद्यालय, देवगांव, औरंगाबाद

चळवळ हळुहळु जोर धरू लागली.

**भौगोलिक स्थिती** : कोल्हापूर जिल्ह्याच्या पश्चिमेस 60 मैलांवर सह्याद्रीच्या घाटात भोगावती नदी उगम पावते डोंगराळ भागातुन नागमोडी वळणे घेत कोल्हापूर जवळ येते. तेथुन तिचा सपाट मुलुखातील प्रवास सुरू होते. पावसाळ्यात पश्चिमेकडुन अरबी समुद्रावरून पाण्याने भरलेले विपुल ढग व खारे वारे सतत येत असल्यामुळे इथे पाउस भरपुर म्हणजे सरासरी 200 इंचा पेक्षाही जास्त पडतो. या भौगोलीक परिस्थितीचा विचार करून महाराजांनी सह्याद्रीच्या पूर्व डोंगराळ प्रदेशात भोगावतीवर ध रण बांधणचा निर्णय घेतला आणि मुळच्या 40 फुट उंचीच्या ध रणाचे बांधकाम सुरू करण्यात आले.[५]

**प्रकल्पाची महाराजांच्या कारकीर्दी नंतरची वाटचाल** : महाराजांच्या धरणाचे बांधकाम पूर्ण झाले नाही. दुसरे महायुद्ध आर्थिक व इतर अडचणी या मुळे बांधकाम लांबतच गेले महाराजांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी संस्थानाकडून आणि मुंबई सरकारकडुन सतत प्रयत्न चालू होते. परंतू त्यात अडचणी येत होत्या. इ. स. 1946 नंतर बांधकामाला गती आली. 1949–55 या काळात 245 लाख रूपये खर्च करून राधानगरी धरणाची उंची 126 फुटा पर्यंत वाढविण्यात आली. त्यामध्ये 8362 दसलक्ष घनफुट पाणी साठविले जाउ लागले. शेतीला कालवे काढून पाणी पुरवढा करणे व दुष्काळावर मात करणे. असा धरणाचा हेतू होता.[६] नंतर वीजनिर्मिती आणि कोल्हापूर शहराला पाणी पूरवठा अशी तीनही योजना एकत्रीत कार्यान्वित करण्यात आल्या. सन 1940 नंतर धरणाचे काम सुरू झाल्यानंतर सर हेन्री होवर्ड, सर एम. विश्वेश्वरया, सी. जी. कोळे यांनी धरणाला भेट दिली होती. त्यांच्या बहुमोल सल्यांचाही उपयोग करण्यात आला.

**धरणांची प्रमूख वैशिष्ट्ये** :

१. दगडी बांधकाम असलेले 140 फूट उंचीचे धरण. २. भोगावती व पंचगंगा नदीवरील कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधून त्यातील पाण्याचा वापर प्रामुख्याने उस शेतीसाठी करीत असत. ३. कोल्हापूर, इचलकरंजी शहराला पाणीपुरवठा. ४. कमी दराने शेतीला पाणी पुरवठा करून अन्न धान्य उत्पादन वाढीला चालना दिली. ५. मत्स्यशेती, मासेमारी विकसीत करण्यासाठी. ६. बंधारे बांधल्यामुळे भोगावती–पंचगंगा नदीवर दळणवळणाची साधने उपलब्ध झाली.[७]

**धरणाची फायदे** : राधानगरी धरणामूळे कोल्हापूर परिसरातील शेतीला होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे उस व इतर पिकांना चालना मिळाली. या भागात उसाचे उत्पादन वाढल्यामूळे आपोआपच गूळ व साखरेचे उत्पादन वाढले. या बरोबरच व्यापार, वाहतूक दळणवळण विस्तारले ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या हातात पैसा खेळू लागला. यामूळे शेतीवर आध ारीत उद्योग सुरू झाले. उदा. दुग्धव्यवसाय, पशूपालन, कुकुटपालन इ. व्यवसाय सूरू झाले. या सर्व बदलामूळे रोजगाराच्या संधी वाढण्यास मदत झाली.[८] त्यामूळे लोक व्यवसायामूळे एकत्र येऊ लागली.

**निष्कर्ष** :1. शाहू महारांजांनी दूरदृष्टीने सुरू केलेला हा प्रकल्प. 2. ज्या उद्येशाने त्यांनी हा प्रकल्प जिद्दीने सुरू केला त्याची फळे आज कोल्हापूर परिसरातील जनतेला मिळत आहे. 3राधानगरी प्रकल्प हे एक आदर्श उदाहरण म्हणून अनुकरणीय अ ाहे. अशा तऱ्हेच्या प्रकल्पाचे जाळे देशभर विणले गेल्यास देशाची नक्कीच आर्थिक प्रगती होईल व देश सुजलाम् सुफलाम् झाल्याशिवाय राहणार नाही.

## सन्दर्भ ग्रन्थ

1 श्री कीर धनंजय आणि–म. फुले समग्र वाङःमय डॉ. फडके य. दी.पृष्ठ क्र. 280. 2. डॉ. जाधव, रमेश – लोक राजा शाहू छत्रपती पृष्ठ क्र. 305 3. डॉ. पवार जयसिंगराव –राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ पृष्ठ क्र. 691 4. कित्ता – पृष्ठ क्र. 692 5. संपा. साळुंखे पी. बी. –राजर्षी शाहू गौरव ग्रंथ पृष्ठ क्र. 419 6. डॉ. पवार जयसिंगराव–राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ पृष्ठ क्र. 698 7. प्रा. कुलकर्णी मीना–यांचा लेख 8. डॉ. मोरवंचीकर रा. श्री. –भारतीय जलसंस्कृती स्वरूप आणि व्याप्ती पृष्ठ क्र. 108